**होळी आणि धुलवड हे सण केवळ ऐतिहासिक किंवा पारंपरिक कारणांनी साजरे होत नाहीत तर त्यात सामाजिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासाच्या दृष्टीकोनातून गंभीर संदेश मिळतो. आजच्या काळात विविधता आणि असमानतेचा विचार करताना या सणांनी समाजमन एकत्र आणणे, एकमेकांप्रती प्रेम आणि सन्मान जागरूक करणे आणि नकारात्मकतेचा नाश करून नवा आरंभ करण्याचे महत्त्व जाणायला हवे.**

# नवसर्जनाचा सोहळा

**प्रासंगिक**
**स्वाती पेशवे**

होळी आणि धुलिवंदन या दिवसांना भारतीय संस्कृतीमध्ये वेगळे महत्त्व दिसते. आध्यात्मिक, सामाजिक, वैयक्तिक, प्रापंचिक अशा विविध परिप्रेक्ष्यातून बघता त्याचे संदर्भ बदलतात आणि त्यातील सगळ्याला जोडून ठेवणारा दृष्टिकोन भावतो. याचे कारण म्हणजे भारतीय संस्कृतीतील हे सण आणि उत्सव म्हणजे केवळ आनंद आणि उल्हास साजरे करण्याचे साधन नाही तर त्यामध्ये गहन संदेश दडलेले दिसतात. होळी आणि धुलवडीचे सण त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. तेव्हा फाल्गुन महिन्यात साजरे होणारे हे दोन सण रंगांचा उत्सव असतातच, पण त्याचबरोबर त्यामध्ये जीवनातील धकाधकी, विषण्णता आणि विकृतींचा नाश करण्याचा एक गोड संदेशदेखील समाविष्ट असलेला दिसतो. या सणांचा संपूर्ण समाजाच्या सर्व स्तरांमध्ये एकतेचा, समानतेचा आणि आध्यात्मिक शुद्धतेचा खूप मोठा प्रभाव आहे. त्यामुळेच केवळ साजरीकरणाकडे नव्हे, तर त्यातील प्रतीकांकडे, या मार्गाने दिल्या जाणाऱ्या संदेशाकडे आणि जगण्याच्या देखण्या कलेकडे सजगतेने बघणे गरजेचे वाटते.



होळीला अद्भूत रंगांचा उत्सव म्हणतात. या सणामागे असणारी कथा अत्यंत गहिरा आणि आदर्श संदेश देते. होलिकेला आग कशी लागली आणि तिच्या संहारामधून भगवान विष्णूच्या दयाळूपणाचा विजय कसा झाला, हे आध्यात्मिक संदेश देताना विषद केले आहे. त्यामुळेच होळी म्हणजे फक्त रंगांची उधळण नव्हे तर ती आपल्या जीवनातील वाईट विचार, वर्तमानातील काळेपणा आणि ताणतणाव यांचा नाश करण्याची प्रक्रिया आहे. म्हणूनच होळीच्या रंगात आपले अंत:करण पवित्र करणे आणि जीवनात नवा उत्साह आणणे हा या साजरीकरणामागील खरा उद्देश म्हणायला हवा.

सामाजिक दृष्टिकोनातून बघायचे तर होळी म्हणजे विविधतेतील एकतेचा उत्सव आहे. या सणामध्ये देशाच्या विविध भागांमधून आणि विविध जातीधर्मांमधील लोक एकत्र येतात, रंगांची उधळण करतात आणि एकमेकांशी प्रेम आणि स्नेहाचे संबंध प्रगट तसेच वृद्धिंगत करतात. म्हणजेच या दिवशी एकाच वेळी धर्म, जात किंवा वर्ग यामधील भेदभाव नाकारून समाज एक होतो. तशाच प्रकारे होळी सणाच्या माध्यमातून सामाजिक समरसतेचा संदेश, एकतेचा विचार आणि समाजाच्या विभाजनाच्या विरोधातील संघर्षही प्रत्येक घराच्या चौकटीपुढे ठामपणे व्यक्त होतो. त्यामुळेच आजच्या जातीधर्मांमध्ये विद्वेष पसवणाऱ्या शक्ती प्रबळ होत असताना, एका अर्थी त्यादेखील होलिकेसमान आपल्या अस्मितेला, एकतेला चूड लावण्याचे काम करत असताना अशा प्रवृत्तींनाच या आगीत भस्मसात करण्याचे काम आजच्या होळी उत्सवामध्ये होणे गरजेचे आहे, असेही म्हणता येईल.

होळीच्या दुसऱ्या दिवशी पावित्र्य आणि मानसिक शुद्धता देणारा दिवस, अर्थात धुलवड साजरी होते. हा दुसरा दिवसही महत्त्वपूर्ण सण असून होळीचे रंग उधळणे आणि धुलवडीच्या दिवशी गंध आणि धूळ यांचा एकत्रित आनंद घेणे हा यामागील विचार आहे. पुन्हा एकदा या कृतीतील आध्यात्मिक संदेशही एक मानसिक आणि आध्यात्मिक शुद्धतेचे गूढ प्रतीक म्हणूनच समोर येतो. कारण धुलवड हा फक्त रंगांचा उत्सव नाही तर आपल्या मानसिक शुद्धतेचा, जीवनातील अशुद्धतेपासून मुक्त होण्याचा आणि पवित्रतेकडे वाटचाल करण्याचा एक सुंदर संकेतही आहे. म्हणजेच केवळ मातीतील धूळ उचलून, ती अंगावर फासून वा माथी लावून पवित्र होणे नाही तर हा जीवनातील नकारात्मकतेचा नाश करून सकारात्मकतेकडे वळण्याचा एक संकेत आहे. पौराणिक दृष्टीकोनातून या सणाचा उद्देश वाईट विचारांपासून मुक्त होऊन एक नवा जीवनारंभ करणे असा आहे. त्यामुळेच धुलवडीला समृद्धीचा, उत्साहाचा आणि नव्याने आरंभ करण्याचा सण मानले जाते.

असे गूढ आणि गहन अर्थ असणाऱ्या या दोन्ही दिवसांचे आधुनिक संदर्भ निश्चितच विचारात घ्यायला हवेत. आजच्या आधुनिक युगात अशा सणांचा प्रभाव आपल्या जीवनाच्या इतर अंगांना स्पर्श करतो तेव्हा अंतर्मन पवीत्र होते. आजच्या जलद आणि ताणतणावांनी भरलेल्या जीवनात, होळी आणि धुलवडी सारख्या सणांचा आनंद एक मानसिक आणि भावनिक शांती मिळवण्याचे उत्तम साधन ठरू शकतो. होळीच्या रंगात वाईट विचार आणि चिंता नष्ट होणे आणि धुलवडीच्या गंधात मानसिक शुद्धता प्राप्त करणे, हे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे ठरते. तसे पहायला गेले अतर ापल्या प्रत्येक सणात एक नवा संदेश असून तो निरंतर विकास, समाजातील ऐक्य आणि जीवनातील शुद्धता, सचोटी, ऊर्जा, नवोन्मेष जपण्याची प्रेरणा देतो. तेव्हा होळी आणि धुलवडीचे महत्त्व लक्षात घेताना आपल्या परंपरेची, संस्कृतीची आणि आध्यात्मिक मूल्यांची जाणीव ठेवणे आणि याचा विशुद्ध जगण्यात समावेश करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. शेवटी या सणांच्या माध्यमातून आपण केवळ उत्सव साजरे करत नाही तर समाजाच्या मानसिकतेला, एकतेला आणि प्रेमाला एक नवा दृष्टीकोनही देतो.

आज आपला देशच नव्हे तर जग अनेक संकटांचा सामना करताना दिसते. पूर्वीच्या मायावी राक्षसांप्रमाणे आजही अनेक मायावी शक्ती तुमच्या आमच्या जीवनयज्ञावर पाणी फिरवण्याचे काम करण्यास सज्ज दिसतात. मात्र होळी आणि धुलिवंदनासारखे सण त्यातूनच नवनिर्माण करण्याची प्रेरणा देऊन जातात. याचा साक्षात्कार वेळोवेळी दिसतो. नैसर्गिक आपत्तींबरोबरच मानवनिर्मित आपत्तीमुळे उद्‌भवलेल्या समस्या अथवा दंगलींमध्येही मानवतेचा चेहरा लपून राहिलेला नसताना काही सहृदयी माणसे प्रश्न मिटवून सर्वसामान्यांची आणि पीडितांची तसेच बाधितांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात, तेव्हा त्या दोघांच्याही आयुष्यात सर्जनाची पहाट फुलते. धुळीतून पुन्हा विश्व निर्माण होते. या सगळ्यामागे 'उद्याची आशा' हा एकच अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. तेव्हा सध्याच्या कष्टप्रद काळातही हाच हेतू समोर ठेवून होळी साजरी करू या. सध्या समाजाला या भावनेची सर्वाधिक गरज आहे, कारण आर्थिक, सामाजिक, राजकीय, आरोग्यविषयक क्षेत्रांमधील अनेक घटनांमुळे तयार झालेल्या नकारात्मक वातावरणात आपले मोठ्या प्रमाणावर खच्चीकरण होत आहे. इतके की, आता आपण नवीन विचार करण्यासही घाबरु लागलो आहोत. पण पुन्हा एकदा उमेद मिळवायला हवी. जगण्याचे नवे मार्ग शोधायला हवे. कारण प्रवाहाप्रमाणेच जगणे प्रवाही रहायला पाहिजे. ते थांबले, खुंटले तर दुर्गंधी येते. ती टाळून जगण्यात वसंत फुलवण्यासाठी नव्या दमाने उभे राहायला हवे.

तेव्हा या होळीप्रसंगी मनाला लागलेली निराशेची जळमटे जाळून टाकण्याची गरज आहे. होळीच्या दिवशी शिव्या देण्याला आणि बोंब ठोकण्यालाही एक अर्थ असतो, कारण या निमित्ताने आपण आयुष्यातले, मनातले कुरुप, अमंगल असेल ते सगळे बाहेर टाकत असतो. त्या अनुषंगाने यंदाच्या होळीला मनातली सगळी जळमटे जाळून टाकायला हवीत. होळीच्या निमित्ताने विसर्जनयोग्य सर्व साहित्य अग्नीच्या हवाली केले जाते. या दिवसांमध्ये जंगलात लागणाऱ्या वणव्यांमध्ये सगळा झाडोराही जळून जातो. शुष्क काष्ठांची राख होते आणि चैत्रपालवीच्या कोवळ्या अंकुरांसाठी रान मोकळे होते. म्हणूनच हे दहन असले तरी मंगलमय असते. या अर्पणाभोवती रांगोळी असते, त्याभोवती सुवासिनींची प्रदक्षिणा असते, त्याला श्रीफलाचा -पुरणपोळीचा नैवेद्य असतो. संगीत-वाद्याची साथ असते. म्हणूनच हे समर्पणही साजिरे असते. अशाच प्रकारे आपणही संपूर्ण समर्पित वृत्तीने समाजासाठी उभे राहण्याची गरज आहे. आपला रिकामा अवधी समाजाच्या सेवेसाठी कसा देता येईल हे पाहण्याची गरज आहे. आपल्या कौशल्याचा, बुद्धीचा समाजासाठी कसा उपयोग होईल, याचाही विचार करायला हवा. सध्या समाजाला आपल्या ठायी असणाऱ्या प्रत्येक कौशल्याची गरज आहे. तेव्हा या दोन सणांनिमित्ताने आपल्या परिसरातले, मनातले सूक्ष्म दोष नाहिसे झाले आणि नव्या वाटा चोखाळल्या तर जगण्याला नवी पालवी फुटणे फारसे अवघड राहणार नाही. आपल्या मनातल्या भावनांचे विरेचन करुन, भावनांना वाट मोकळी करुन देण्याचा हा मार्ग सगळ्यांना चांगल्या स्थळापर्यंत पोहोचवो, हीच सदिच्छा.

---

**जागतिक महिला दिन वा यासारखे निमित्त निर्माण करत महिलाविषयक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम होत असले तरी, पूर्वीपेक्षा प्रश्न फारसे वेगळे दिसत नाहीत. आजही महिलांविषयक प्रश्नांचा गुंता गुंतागुंतीचा आणि जटीलच आहे कारण आजही महिलांना अनुकूल असणाऱ्या सामाजिक, कार्यालयीन, सांस्कृतिक, सामाजिक वातावरणाचा अभावच आहे. ही इको सिस्टीम सुधारेपर्यंत बदलाची अपेक्षा करण्यात अर्थ नाही.**

# 'वेग आणि वाढ' साधणार केव्हा?

**चर्चेत**
**रमा सरोदे, विधिज्ञ**

जागतिक महिला दिनाच्या औचित्याने यंदाच्या 'वेग आणि वाढ' या थीमची माहिती घ्यायला हवी. कारण दरवर्षीप्रमाणे या पुढचा काळही स्त्रीविषयक प्रश्नांचा बराच उहापोह होईल. त्यांचा समाजातील स्तर उंचावण्याच्या हेतूने काही प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. मात्र असे सगळे असूनही आजही त्यांच्या मूलभूत समस्या सुटलेल्या आहेत की नाही, हे बघणे आवश्यक आहे.



१९७५ मध्ये युनायटेड नेशन्सने 'डिकेड फॉर वुमेन' जाहीर केले त्याला यंदा ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानंतरच्या, म्हणजेच साधारणत: १९८३ नंतरच्या काळात स्त्रीविषयक कायद्यांमध्ये बरेच बदल झालेले आपण पाहिले. त्याच दशकात म्हणजे १९७९ मध्ये 'सीडॉ' (कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेंस्ट वुमन) आले. याला आपण महिलांविरुद्ध भेदभाव निर्मूलन समिती असेही म्हणू शकतो. जगाबरोबर आपणही याचा स्विकार केला आणि महिलांसाठी कायदे येऊ लागले. त्यात हुंडाप्रतिबंधक वा हुंडाबळीविषयक कायदा, ४९८ सारखा कौटुंबिक हिंसाचारविषयक कायदा आदींचा समावेश होतो. आधी कौटुंबिक हिंसाचारविषयक कायदा फौजदारी कायदा होता. पण बहुचर्चीत मथुरेशा प्रकरणानंतर पुराव्यासंदर्भातील कायदा बदलण्यात आला. बलात्काराची घटना घडल्यानंतर आपली संमती नसल्याचे एखादी स्त्री सांगते तेव्हा हे सिद्ध करण्याची जबाबदारीही तिच्यावरच होती. कारण फौजदारी कायद्यामध्ये फिर्यादीवरच ही जबाबदारी असते. आपला कायदा सिद्ध झाल्याशिवाय संशयिताला गुन्हेगार मानत नाही. मात्र मथुरेशा प्रकरणामुळे हा कायदा बदलला. म्हणजेच महिलांच्या या शतकात असे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत आणि घडतही आहेत. मात्र असे असले तरी खरोखरी महिला त्याचा वापर करु शकत आहेत का, हा प्रश्न उरतो. कारण हे तेव्हाही मोठे आव्हान होते आणि आजही आव्हानच आहे.

आताचे प्रश्न फारसे वेगळे नाहीत. कौटुंबिक हिंसाचाराचा प्रश्न आहेच. पण २००५ मध्ये दिवाणी स्वरुपाचा एक वेगळा कायदा आला. याचे कारण म्हणजे सासरच्या लोकांना गुन्हेगार ठरवण्यात महिलांना रस नसल्याचे लक्षात आले, कारण असे सिद्ध झाल्यास तीच बेघर होते. तिला पोटगी मिळत नाही, कारण नवराच तुरुंगात जातो. माहेरचा पाठिंबा नसेल तर ती फार काही करु शकत नाही. म्हणजेच असे कायदे असले तरी अडचणीही तेवढ्याच होत्या. यातून तिला हक्क मिळत नव्हता. म्हणूनच दिवाणी कायदा आणून संवादातून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र संवाद होण्यासाठी आधी हिंसा थांबणे गरजेचे आहे. या हेतूने आधी उल्लेख केलेला २००५ चा कौटुंबिक हिंसाचार कायदा आला. त्यामध्ये एक व्यापकता बघायला मिळाली. ती म्हणजे फौजदारी कायदा फक्त लग्न झालेल्या स्त्रियांना संरक्षित करत होता. पण या दिवाणी कायद्याच्या कक्षा रुंद होत्या. त्यामुळेच रक्ताचे नाते असेल, दत्तक घेतल्यामुळे वा लिव्ह इन तसेच लग्नाच्या अशा कोणत्याही नात्याला या कायद्याने डेमोस्टिक नाती मानले आणि त्यातील हिंसाचाराला कौटुंबिक हिंसाचाराच्या कक्षेत आणले. आधी स्त्रीला वडिलोपार्जित मालमत्तेतही हक्क नव्हता. मात्र नंतर यातही बदल होत महिलेलाही वडिलोपार्जित मालमत्तेत हक्क मिळाला पाहिजे, हा विचार स्विकारला गेला. २००५ मधील कायद्याद्वारे झालेला हादेखील एक महत्त्वाचा बदल म्हणावा लागेल.

हे सगळे बदल महिलांना पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने अत्यंत सकारात्मक आहेत. मात्र तरीही अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. शिक्षणापासून दूर राहणाऱ्या मुलींची संख्या मोठी आहे. मुलींचा बालविवाह होण्याचे प्रमाण वाढत आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यातही हे प्रमाण वाढताना बघायला मिळते. म्हणजेच मुलीकडे एक ओझे वा जबाबदारी म्हणून बघण्याची मानसिकता वा वृत्ती पूर्वीही होती आणि आजही त्यात फारसा बदल झालेला दिसत नाही. यातूनच मग गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा आणावा लागला. यातूनच महिलांना कोणकोणत्या पातळीवर संरक्षित करण्यासाठी कायदे आणावे लागले, हे कळते. आज 'मुलगी नको' म्हणण्यामागे ती आपल्याला मोक्ष देऊ शकणार नसल्याचा धार्मिक विचार पुढे येताना दिसतो. तिला शिक्षण दिले तर सासरी जाऊन तिकडेच पैसे देणार असल्यामुळे आपला खर्च वाया जाण्याची भावना वा भूमिका असणारा पालकवर्ग आजच्या समाजातही पहायला मिळतो. एकंदरच सामाजिक, आर्थिक अशा अनेक पैलूंनी पाहता ती ओझे असल्याचे मत अद्यापही पूर्णपणे बदललेले दिसत नाही. याचाच परिणाम म्हणून ती मुख्य प्रवाहातून मागे राहिली आणि अजूनही मागेच रहात आहे.




'समान कामासाठी समान मोबदला' हा समतेचा निकष आजही अनेक महिलांना अनुभवायला मिळत नाही. आकडेवारी बघता, तितकेच काम केले तरी आजही महिलेला कामासाठी पुरुषांच्या तुलनेत समान पैसे मिळताना दिसत नाहीत. गर्भारपणासाठी महिलेला ठराविक काळ पगारी रजा देणारा कायदा चांगला असला तरी, असे पैसे द्यावे लागू नयेत, यासाठी अनेक कंपन्यांकडून घातले जाणारे जाचक नियमही बरेचदा चर्चेत असतात. खेरीज लहान मूल असणाऱ्या स्त्रीला काम देण्यासही अनेकांचा नकार असतो. म्हणजेच घरातही तिला पूरक वातावरण नसते तर दुसरीकडे कार्यस्थळीदेखील त्याचा अभावच असतो. थोडक्यात, ही सगळी इको सिस्टीमच विरोधात असल्यामुळे कितीही कायदे केले आणि कितीही ठराव संमत झाले तरी स्त्रियांना पोषक वातावरणाची अद्यापही प्रतीक्षा आहे, असे म्हणावे लागेल.

वरील सर्व उदाहरणे आताच्या काळात समानता आली आहे, या मताचे खंडन करतात. स्त्रीची कुवत, ताकद, चातुर्य, क्षमता ओळखणारी आणि या गुणांचा गौरव करत तिचे स्थान मान्य करणारे अतिशय मोजकी ठिकाणे पहायला मिळतात. आजचा समाज तिच्यातील कौशल्याचा हवा तितका पुरस्कारही करत नाही आणि प्रोत्साहनही देत नाही. इथेही तिला स्त्री असल्याच्या मर्यादांच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. बहुचर्चित 'मी-टू' चळवळीद्वारे स्त्रियांना सहन कराव्या लागणाऱ्या अशा अनेक गोष्टी समोर आल्या आहेतच.

टॉलिवूडसंबंधीचा जस्टिस हेमा रिपोर्टही या प्रश्नावर प्रकाश टाकणारा म्हणावा लागेल. यामध्ये दाक्षिणात्य फिल्म इंडस्ट्रीमध्ये लैंगिक छळ सोसणाऱ्या अनेकजणींनी कमिटीपुढे येऊन गाऱ्हाणे मांडले खरे, पण आता त्यांची कामे गेलेली आहेत. आज कोणीही त्यांना काम देण्यास तयार नाही. त्यामुळेच आपण यंदाच्या महिला दिनानिमित्त जाहीर झालेल्या 'वेग आणि वाढ' या थीमचा विचार करतो तेव्हा हे होण्यासाठी काय काय करणे गरजेचे आहे, हे अधिक गांभीर्याने पहायला हवे. केवळ कायदे करुन चालणार नाही तर समाजाची मानसिकता बदलली आहे का, याचा विचार व्हायला हवा. आता तरी आपण महिला हे करु शकतात, महिला हे करु शकत नाहीत वा काही कामे महिलांची नाहीतच किंवा काही कामे महिलांनीच केली पाहिजेत; अशा मानसिकतेतून बाहेर येणे गरजेचे आहे. ते साधत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने थीममध्ये व्यक्त केलेली वेग आणि वाढीची स्थिती महिलांचे आयुष्य उजळून टाकताना दिसणार नाही.

केवळ लिंगआधारितच नव्हे तर जाती, धर्म, लैंगिकता या सर्व पातळ्यांवर महिलांना समान पातळीवर ठेवून मान मिळणे गरजेचे आहे. कारण या प्रत्येक पातळीवर उतरंडीत महिला अगदी शेवटच्या पायरीवर दिसतात. जात व्यवस्थेबाबत बघायचे तर त्या जातीची ती महिला सर्वात खाली असते. धर्माबाबतही ती महिला सर्वात खालीच दिसते. कारण त्या जातीतील वा धर्मातील पुरुषच प्रथम स्थानी दिसतो. म्हणजेच कोणताही निकष लावला वा कोणतेही क्षेत्र घेतले तरी पुरुषांच्या तुलनेत ती नेहमी खालच्या जागीच दिसते वा तिला जाणीवपूर्वक तिथेच ठेवले जाते. शिडीतील तिचा क्रम अभावानेच वरचा दिसतो. त्यामुळेच समानतेचे मूल्य केवळ दाखवून चालणार नाही तर आता ते प्रत्यक्षात उतरवण्याची गरज आहे. त्यासाठी खऱ्या अर्थाने महिलांच्या गरजा काय आहेत, हे समजून घ्यायला हवे. एकदा ते समजले की समानता आणि सहभागाचा खरा मेळ घालणे शक्य होईल. त्यांच्या गरजेनुसार वातावरण तयार झाले तरच खरी क्षमता बाहेर येऊन त्या इतिहास घडवू शकतील. हा विचार आता तरी पुढे यायला हवा.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)



**२०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणात रोजगाराचे उज्ज्वल चित्र सादर केले असले, तरी सेवा आणि बांधकामक्षेत्रात रोजगारघट आणि कृषी नोकऱ्यांमध्ये वाढ याबद्दल केवळ बोलून चालणार नाही. आजघडीला सरकार शेतीतून इतर क्षेत्रांकडे रोजगार वळवू शकलेले नाही. सरकारी नोकऱ्या घटून खाजगी नोकऱ्या वाढल्यानंतरच्या बारा वर्षांमध्ये खाजगी रोजगाराचे प्रमाण सतत वाढत असले तरी सरकारी रोजगार मात्र आक्रसू लागला आहे.**

# काय आहे आजचे रोजगारचित्र?

परामर्श

**हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार**

नरसिंह राव पंतप्रधान असताना केंद्रीय अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारणा आणल्यामुळे देशात एक नवमध्यमवर्ग निर्माण झाला. औद्योगिक उपक्रमशीलतेला चालना मिळून नवउद्योजक तयार होऊ लागले. तरुण-तरुणींना सरकारी नोकरीच्या बाहेर अन्य क्षेत्रे खुणावू लागली. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी एक लाख कोटी रुपयांच्या करसवलती दिल्या आहेत. त्यामुळे सततची भाववाढ, घटलेले उत्पन्न आणि जीएसटी यामुळे संत्रस्त झालेल्या शहरी आणि निमशहरी भागातील मध्यम वर्गाला दिलासा मिळाला. बारा लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर करसवलतीची घोषणा करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात मध्यमवर्ग तयार झाला, तो सार्वजनिक क्षेत्राच्या निर्मितीमुळे. विविध क्षेत्रांमध्ये सरकारी कंपन्या स्थापन करण्यात आल्या आणि १९९५ मधील आकडेवारीनुसार, सरकारी कंपन्यांमध्ये जवळपास दोन कोटी रोजगार निर्माण झाला होता. तर संघटित खाजगी क्षेत्रात फक्त ८० लाखजणांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. २०१२ पर्यंत ही आकडेवारी अनुक्रमे पावणेदोन कोटी आणि एक कोटी १९ लाख अशी झाली. याचा अर्थ, सरकारी नोकऱ्या घटू लागल्या आणि खाजगी नोकऱ्या वाढल्या. त्यानंतरच्या बारा वर्षांत खाजगी रोजगाराचे प्रमाण आणखी वाढून, सरकारी रोजगार मात्र आक्रसू लागला.

भारतात सर्वाधिक नोकऱ्या या रेल्वेमध्ये आहेत. परंतु १९९०- ९१ ते २०२२-२३ या काळात रेल्वेमध्ये नोकरी करणाऱ्यांची संख्या सुमारे १६ लाखांवरून १२ लाखांवर आली. एक तर रेल्वेतील केटरिंगपासून अनेक प्रकारच्या सेवांचे खाजगीकरण झाले आहे. काही मार्गदेखील खाजगी कंपन्यांकडे सोपवण्यात आले आहेत. यांत्रिकीकरण साहजिकच वाढले आहे. दुसरीकडे, आर्थिक उदारीकरणानंतर सर्वाधिक विस्तारणारे क्षेत्र म्हणजे माहिती तंत्रज्ञान किंवा आयटी. दुसऱ्या मध्यमवर्गीय क्रांतीचे ते प्रतीकच बनले होते. आपला मुलगा किंवा मुलगी आयटी क्षेत्रामध्ये नोकरी करत आहे, हे अत्यंत अभिमानाने सांगणारे पालक जागोजागी दिसू लागले. २००४ मध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि इन्फोसिसमध्ये अनुक्रमे ४५ हजार आणि ३६ हजार कर्मचाऱ्यांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. त्यानंतरच्या वीस वर्षात हा आकडा अनुक्रमे साडेचार लाख आणि अडीच लाख इतका वाढला. परंतु खरी तेजी आली, ती कोविड महामारी संपल्यानंतर. कारण त्यामुळे भारतातील डिजिटलीकरणाची प्रक्रिया अत्यंत गतिमान झाली. ऑनलाइन व्यवहार होऊ लागले आणि भारतीय कंपन्यांची क्षमतादेखील वाढली. भारताच्या सॉफ्टवेअर निर्यातीत लक्षणीय भर पडू लागल्याने, आयटी कंपन्यांमधील रोजगार आणखी वाढला. केवळ टीसीएस, इन्फोसिस, विप्रो, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि टेक महिंद्रा या पाच कंपन्यांमध्ये सुमारे १६ लाख लोक काम करत आहेत.

भारतीय रेल्वेमध्ये आज कायमस्वरूपी साडेबारा लाख लोक काम करतात, त्यापेक्षाही आयटीमध्ये जास्त लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. सर्वाधिक विस्तार अनुभवणारे दुसरे क्षेत्र म्हणजे बँकिंग. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रियेत वित्तीय सेवांना महत्त्व आले आहे. शिवाय डिजिटलीकरणामुळे बँकिंग व्यवहारांचा वेग वाढला आणि नवनवीन वित्तीय प्रॉडक्ट्स बाजारात येऊ लागली. कर्जबाजारी झालेल्या राष्ट्रीयीकृत बँकांची परिस्थिती सुधारली, परंतु त्याचबरोबर काही बँका आपापसात विलीन करण्यात आल्या. त्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या. त्याचबरोबर खाजगी बँकांचा व्यवहार सावधगिरीचा राहिला असल्यामुळे त्यांचा नफा दिवसेंदिवस फुगतच होता. राष्ट्रीयीकृत आणि खाजगी बँकांमध्ये मुख्यतः मध्यमवर्गातील लोकच अधिक प्रमाणात कामाला आहेत. १९९१-९२ मध्ये शेड्यूल व्यापारी बँकांमध्ये सुमारे दहा लाख लोकांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. त्यामधील साडेआठ लाख लोक हे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये काम करत होते. आज तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खाजगी बँकांमधील रोजगाराचे प्रमाण सुमारे सहा लाख इतके आहे. परंतु सरकारी बँकांमध्ये आजदेखील सुमारे पावणेआठ लाख लोक काम करत आहेत. २०२३-२४ मध्ये मात्र सरकारी क्षेत्रापेक्षा खाजगी बँकांमधील रोजगार जास्त झाला आहे. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये साडेसात लाख लोक कामाला आहेत, तर खाजगी बँकांमध्ये पावणेनऊ लाख! क्षेत्र खाजगी असो वा सरकारी, तरुण हातांना काम मिळणे हे अधिक महत्त्वाचे आहे.

आजघडीला एचडीएफसी, आयसीआयसीआय, ॲक्सिस, कोटक महिंद्र आणि बंधन बँक या पाच बँकांमध्ये मिळूनच सहा लाखजण काम करत आहेत. सरकारी बँकांमध्ये सर्वाधिक रोजगार देणारी बँक म्हणजे स्टेट बँक. तेथे २ लाख ३२ हजार लोक काम करत आहेत. मात्र कमी माणसांमध्ये जास्त नफा मिळवणे आज अधिक महत्त्वाचे आहे. आर्थिक शिथिलीकरणामुळे बँकिंग, विमा, म्युच्युअल फंड, शेअर दलाली, अकाउंटन्सी, आरोग्य, कायदा सल्ला, पर्यटन, वाहतूक, लॉजिस्टिक्स, हवाई सेवा, माध्यम, जाहिरात, क्रीडा, करमणूक, रिअल इस्टेट आणि रिटेल या क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी उत्पन्न झाल्या आहेत. ज्याप्रमाणे चीनमधून जगात विविध प्रकारचा माल धाडला जातो, त्याप्रमाणे भारतातून अनेक कंपन्यांचे बॅक ऑफिस चालवले जाते. परंतु बांधकाम, स्वच्छता, सुरक्षा, घरगुती कामे, शॉप असिस्टंट वगैरे क्षेत्रांमध्ये कामगारांना तुलनेने पगार कमी असतो. उबेरमध्ये दहा लाख ड्रायव्हर्स काम करतात, तर झोमॅटोमध्ये दरमहा सरासरी चार लाख ८० हजार डिलिव्हरी बॉईजना काम मिळते. स्विगीमध्ये साडेपाच लाख तर अन्य क्विक कॉमर्स सेवांमध्ये दीड लाख लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. परंतु या प्रकारच्या नोकऱ्यांमधून मध्यमवर्गीय जीवन जगण्याइतपत वेतन मिळत नाही. तसेच भारतातील मध्यमवर्ग मुख्यतः सेवा क्षेत्रात काम करतो. आपल्याकडे उत्पादन क्षेत्र तेवढे विकसित झालेले नाही. त्या क्षेत्रात सरासरी उत्पन्न जास्त असते. आजही उत्पादन क्षेत्रातील रोजगार दहा टक्क्यांच्या आसपास आहे. हे प्रमाण एकूण रोजगाराच्या २५ टक्क्यांवर पोहोचवण्याचे लक्ष्य दहा वर्षांपूर्वीच जाहीर करण्यात आले होते!

२०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणात रोजगाराचे उज्ज्वल चित्र सादर केले असले, तरी सेवा आणि बांधकाम क्षेत्रात रोजगारघट आणि कृषी नोकऱ्यांमध्ये वाढ याबद्दल बोलून सरकार शेतीतून रोजगार इतर क्षेत्रांकडे वळवू शकले नाही हे सिद्ध झाले आहे. सरकारने २०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षणात म्हटले होते की, भारतीय अर्थव्यवस्थेला वाढत्या कामगार लोकसंख्येला उत्पादकतेने गुंतवून ठेवण्यासाठी २०३० पर्यंत दर वर्षी ७.८५ दशलक्ष सरासरी बिगरशेती नोकऱ्या निर्माण कराव्या लागतील. याचा अर्थ असा की शेतीपासून बिगरकृषी रोजगाराकडे संक्रमण साध्य करण्यासाठी भारताला दर वर्षी सुमारे ३.५ दशलक्ष लोकांना शेतीतून काढून टाकावे लागेल आणि बिगरकृषी क्षेत्रात ७.८५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण कराव्या लागतील. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणातून दिसून येते की, सरकार लोकांना कृषी क्षेत्रापासून सेवा किंवा उत्पादन क्षेत्राकडे वळवू शकलेले नाही. आर्थिक सर्वेक्षणात म्हटले आहे की रोजगारात कृषी क्षेत्र अजूनही आघाडीवर आहे. २०१७-१८ मध्ये रोजगारामध्ये त्याचा वाटा ४४.१ टक्के होता. २०२३-२४ मध्ये तो ४६.१ टक्के झाला आहे. म्हणजेच, गेल्या सहा वर्षांमध्ये रोजगारासाठी शेतीवरील अवलंबित्व दोन टक्क्यांनी वाढले आहे.

या आकडेवारीवरून दिसून येते की शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रे रोजगारनिर्मितीमध्ये यशस्वी होत नाहीत. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की रोजगारामध्ये उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वाटा कमी झाला आहे. सर्वेक्षण दस्तावेजात, पीरियडिक लेबर फोर्स सर्व्हे (पीएलएफएस) २०२३-२४ च्या अहवालाचा हवाला देऊन म्हटले आहे की २०१७-१८ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये रोजगार प्रदान करण्यात उत्पादन क्षेत्राचा वाटा १२.१ टक्क्यांवरून ११.४ टक्क्यांपर्यंत कमी झाला आणि सेवा क्षेत्राचा वाटा ३१.१ टक्क्यांवरून २९.७ टक्क्यांपर्यंत कमी झाला. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की कृषी क्षेत्रात महिला कामगारांच्या वाट्यात लक्षणीय वाढ झाली आहे. यावरून असेही दिसून येते की इतर क्षेत्रांमध्ये अपेक्षित रोजगारनिर्मिती होत नाही. आर्थिक सर्वेक्षणात असेही म्हटले आहे की महिला कृषी रोजगार २०१७-१८ मध्ये ७३.२ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये ७६.९ टक्क्यांपर्यंत वाढला आहे तर पुरुषांचा सहभाग ५५ टक्क्यांवरून ४९.४ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. शहरी भागातील महिला प्रामुख्याने इतर सेवांमध्ये काम करतात. या क्षेत्रातील त्यांचा वाटा ४४.४ टक्क्यांवरून ४०.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे.








# धुरांच्या वलयापासून दूर जाण्यासाठी...

**दर वर्षी नऊ मार्च जागतिक पातळीवर धूम्रपानविरोधी दिवस म्हणून पाळला जातो. केवळ धूम्रपानाची सवय सोडण्यास प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा उद्देश नाही तर, त्याच्या घातक परिणाम ांविषयी जागरूकता वाढवणे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित शारीरिक आणि मानसिक आरोग्याची जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा देणे हे आहे. या निमित्ताने आजच्या पिढीला या समस्येची ओळख करून करुन देणेही गरजेचे आहे.**

दखल

**उर्मिला राजोपाध्ये**

दर वर्षी नऊ मार्च हा दिवस 'नो स्मोकिंग डे' अर्थात धूम्रपानविरोधी दिवस म्हणून पाळला जातो. धूम्रपान आरोग्याला घातक असून त्यामुळे कर्करोगासारखे आजार जडण्याची तसेच जीवाला धोका उत्पन्न होण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, हे माहिती असले आणि मान्यवरांनी वारंवार त्यासंबंधी सूचित केले असले तरी सिगारेटच्या पाकिटावर लिहिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करत धूम्रपान करणाऱ्यांचे प्रमाण आजही कमी झालेले नाही. त्यामुळेच या दिवसाच्या निमित्ताने यासंबंधीच्या सध्याच्या आव्हानांवर चिंतन करणे गरजेचे ठरते. ९ मार्च या दिवशी धूम्रपानाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न होतो. हेच हा दिवस पाळला जाण्यामागील प्रयोजन आहे. धूम्रपानाच्या सवयीचे समाज आणि व्यक्तीवर होणारे हानिकारक परिणाम सांगणारा हा दिवस केवळ धूम्रपान करणाऱ्यांच्याच नव्हे तर त्याच्याबरोबर राहणाऱ्या, वावरणाऱ्या प्रत्येकाच्या आरोग्याच्या दृष्टीने एक गंभीर संदेश देतो. आधुनिक युगात तर धूम्रपानाशी संबंधित अनेक नवे प्रश्न आणि आव्हाने समोर येत आहेत, कारण सिगारेट किंवा अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केवळ शारीरिक हानी करत नाही, तर सामाजिक, मानसिक आणि आर्थिक परिणामही घडवतो. म्हणूनच त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

आजच्या काळात धूम्रपानाच्या हानीची माहिती लोकांपर्यंत पोहोचली असली तरी अनेक कारणांमुळे ते या व्यसनापासून मुक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळेच सध्या आधुनिक तंत्रज्ञानाने जग माहितीशी जोडले असले आणि या माध्यमातून जगभर संकलित होणारी माहिती आणि त्याचे गांभीर्य समोर येत असले तरीही धूम्रपानाची सवय हे एक सामाजिक ओझेच आहे. त्यामुळेच यावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्याचे आव्हान आज जगासमोर आहे. आजकाल धूम्रपानाचे प्रमाण वाढले आहे. विशेषत: तरुणांमध्ये ते कमालीचे वाढले आहे. सोशल मीडियाच्या माध्यम ातून जास्त माहिती पोहोचत असल्याने धूम्रपानाकडे एक फॅशन म्हणून बघण्याची मानसिकता दिसत आहे. कधी कधी फॅशनच्या, थ्रीलच्या नावाखाली तर कधी मानसिक ताणतणाव किंवा एखाद्या ठिकाणी वेटिंगच्या वेळेत, ग्रुपबरोबर मस्तीच्या मूडमध्ये असताना धूम्रपान करण्याची सवय लागते, जी अल्पावधीत व्यक्तीचा कब्जा घेते. अर्थातच या सवयीमुळे युवा पिढीच्या आरोग्याबाबतच्या अडचणी वाढतात.

धूम्रपानामुळे जागतिक आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांची चर्चाही या निमित्ताने करायला हवी. कारण 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन'च्या अहवालानुसार धूम्रपानामुळे प्रत्येक आठ सेकंदाला एक व्यक्ती मृत्युमुखी पडते. या व्यसनामुळे जडणाऱ्या आजारांची यादी तर बरीच लांबलचक आहे. जसे की, यामुळे फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि इतर शारीरिक विकार जडतात आणि त्यामध्ये जगभर लाखो लोकांचा जीव जातो. म्हणूनच याबद्दल अधिक माहिती देऊन लोकांमध्ये अधिक प्रमाणात जागरूकता निर्माण होण्याची आवश्यकता आहे. यासबंधीचा आणखी एक मुद्दा म्हणजे आता सिगारेट्स आणि तंबाखूजन्य उत्पादने केवळ पारंपरिक पद्धतीनेच नाही तर इलेक्ट्रॉनिक सिगारेट्स आणि व्हेपिंगच्या रूपातदेखील बाजारात उपलब्ध आहेत. अनेकजण व्हेपिंग किंवा ई-सिगारेट्स कमी धोकादायक म ानतात. प्रत्यक्षात अशी उत्पादने स्वास्थ्यासाठी इतर सिगारेट्सपेक्षा जास्त धोक्याची ठरू शकतात. त्याम ुळेच यासंबंधीचे इत्यंभूत शिक्षण आणि जागरूकता निर्मितीसाठी या दिवसाचे औचित्य साधायला हवे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे धूम्रपानाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम अत्यंत जटील आणि धोकादायक आहेत. आजच्या जगात धूम्रपानाची समस्या केवळ व्यक्तीला प्रभावित करत नाही तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर आणि कुटुंबावर होतो. त्यामुळेच हा एक सामाजिक प्रश्न बनतो. धूम्रपानाच्या शारीरिक परिणामांची चर्चा नेहमीच होते. मात्र मानसिक दृष्टीनेही धूम्रपान अनेक मानसिक समस्या निर्माण करते. या एका सवयीमुळे शरीरातील रसायनांचे संतुलन बिघडते. परिणामस्वरूप ताण, चिंता आणि इतर मानसिक विकार उद्‌भवतात. खेरीज धूम्रपानामुळे समाजावर देखील प्रतिकूल प्रभाव पडतो. तंबाखूचे सेवन ही एक महागडी सवय असल्यामुळे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करू शकते. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे हे दुसऱ्या लोकांच्या आरोग्याशी खेळ करण्यासारखे तसेच त्यांचे आरोग्य धोक्यात आणणारे कृत्य ठरते.

हे सर्व लक्षात घेता हा दिवस धूम्रपानाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि हे व्यसन सोडण्याची प्रेरणा देण्यासाठी किती महत्त्वपूर्ण आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. या दिवशी जागतिक स्तरावर विविध उपक्रम आयोजित केले जातात. लोकांना धूम्रपानाच्या हानीबद्दल अधिक माहिती देणे, त्याचे दुष्परिणाम समजावणे आणि धूम्रपान सोडण्यासाठी मदत करणारे कार्यक्रम राबवणे यांचा त्यात समावेश असतो. आता लोकांना तंबाखू सेवनाच्या सवयीपासून मुक्त करण्यासाठी सरकार, आरोग्य संघटना आणि समाजाच्या सर्व स्तरांवर व्यापक प्रयत्न होताना दिसत आहेत. त्याचा लाभ घेतला तर अनेकजण या व्यसनाच्या जोखडातून सुखरुप बाहेर पडू शकतील.धूम्रपानाच्या विरोधात जागरूकता निर्माण करण्यासाठी सरकारचे नेहमीच महत्त्वपूर्ण योगदान असते. अनेक देशांमध्ये धूम्रपानाच्या प्रतिबंधासाठी कडक कायदे केले गेले आहेत. उदाहरणार्थ, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी, तंबाखू उत्पादकांवर जबरी कर लावणे आणि तंबाखू उत्पादनांच्या पॅकिंगवर आरोग्यसंबंधित सूचना देणे हे सर्व प्रभावी उपाय आहेत. भारतातही सरकारने निगेटिव्ह इन्फॉर्मेशन किंवा हे व्यसन घातक असल्याचे संकेत देणाऱ्या चिन्हांचा वापर करण्याकामी पुढाकार घेतला आहे.

तसे पाहायचे तर अनेक लोक धूम्रपानाच्या सवयीपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यातील सगळेच यशस्वी होतात असे नाहीत. म्हणूनच व्यसनापासून दूर जाण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या उपायांचीही या निमित्ताने चर्चा व्हायला हवी. जसे की, समुपदेशन, व्यसनमुक्ती सत्रे, निकोटिन रिप्लेसमेंट थेरपी आणि इतर शारीरिक आणि मानसिक उपचारांची वारंवार चर्चा होत राहिली आणि उपयुक्तता समोर आणली गेली तर अनेकांना या विळख्यातून सुटण्याचा श्रेयस्कर मार्ग सापडू शकतो. खेरीज यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचीही चर्चा होऊ शकते. उदाहरणार्थ, मानसिक आणि शारीरिक रूपाने आत्मविश्वास वाढवणे, तणाव आणि चिंता कमी करणे आणि मनापासून धूम्रपानाची सवय सोडण्यासाठी प्रयत्नशील राहणे याचे महत्त्व अधोरेखित केल्यास हा व्युह भेदणे शक्य होऊ शकेल. तंबाखूविरोधी जागरूकता वाढवण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक संघटना कार्यरत आहेत. त्याचबरोबर भारतातील स्मोक फ्री इंडिया कॅम्पेन, क्विटलाईन हेल्पलाइन तसेच आरोग्यसंबंधित संस्थांमार्फत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे यावर चर्चा होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. सामाजिक माध्यमांद्वारे धूम्रपानाचे दुष्परिणाम सांगणारे संदेश आणि जाहिरात हेदेखील सध्याच्या काळातील प्रभावी उपाय ठरतात.

धूम्रपानाचा परिणाम व्यक्तीच्या आरोग्याबरोबरच पर्यावरणावरही होतो. सिगारेटच्या धुरामुळे हवा आणि जमिनीमध्ये प्रदूषण होते. धुराचे कण वातावरणात पसरतात आणि पर्यावरणाच्या गुणवत्तेवर घातक परिणाम करतात. त्यामुळे धूम्रपानावर नियंत्रण ठेवणे ही केवळ आपल्या आरोग्यासाठी नाही तर पृथ्वीच्या आरोग्यासाठीही महत्त्वाची बाब आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. शेवटी धूम्रपान हा मानसिक आणि भावनिक स्थितीशी संबंधित असू शकते, हे यायोगे लोकांनी समजून घ्यायला हवे. धूम्रपानाने मानसिक ताण आणि चिंता कमी होत नाहीत, तर वाढतात. व्यसनाने मिळणारे तात्पुरते समाधान तुमच्या दीर्घकालीन मानसिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम करु शकते. म्हणूनच धूम्रपान सोडण्यासाठी मनाची ताकद वाढवणे इतर शारीरिक तंत्रांचा वापर करत या व्यसनापासून शक्य तेवढ्या लवकर दूर होणे केव्हाही चांगले.



# आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

आजही आपल्याला ज्ञात होते की स्त्रिया उत्तम राज्यकारभार व राज्याचे संरक्षण करू शकतात. कित्येक स्त्रिया राज्यकारभारासोबत प्रत्यक्ष मैदानात शत्रूशी दोन हात करताना दिसल्या. पहिल्या महायुद्धात 1914 ते 18 व दुस?्या महायुद्धात 1939 ते 45 या काळात सुमारे 350 स्त्रिया नर्सिंग सेवा देत होत्या. याच कार्यात एस .एस. कौला ,नूर इनायत खान ,कल्याणी सेन या तीन स्त्रियांची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. सुभाष चंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद फौजेमध्ये राणी झाशी रेजिमेंटमध्ये लक्ष्मी स्वामीनाथन व जानकी देवर या सेनापती होत्या. 1958 पासून सैन्यसंरक्षण हा स्त्रियांसाठी पहिला विभाग तयार झाला न्यायालयाने 1921 या शैक्षणिक वषार्पासून मुलींना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या प्रवेश परीक्षेस बसण्याची परवानगी दिली.

निरीक्षणा नुसार 3.80% भूदल 13.0.9% नौदल अशी स्त्रियांची संख्या आहे. कमांडर ही रँक मिळवणाऱ्या डॉ. बार्बरा घोष नौदलातील पहिल्या महिलाआहेत. नौदल लेफ्टनंट जनरल पुनिताअरोरा पहिल्या महिला आहेत. ले. कुमुदिनी त्यागी व सब लेफ्टनंट रीती सिंग या सर्वांना विंग्ज ही उपाधी दिली गेली.

शुभांगी स्वरूप नौदलाच्या पहिल्या महिला पायलट आहेत.समुद्रातील दक्षिणेकडील हद्दीचा शेवटचा तळ तिथे लेफ्टनंट नवनीत कौर रसदपुरवठा अधिकारी आहेत. प्रेरणा देवस्थळी भारतीय नौदल युद्धनौकेच्या पहिल्या अधिकारी बनल्या. नाविका सागर परिक्रमा 2017 ते 2018 या वर्षात केली.

दुसरी नाविका सागर परिक्रमा तारिणीने 2 ऑक्टोबर 2024 रोजी पूर्ण केली. यात आठ महिन्यांनी पवन ऊर्जेच्या आधारावर 21600 सागरी महिलांचा प्रवास केला. हे नारी सबलीकरण आत्मनिर्भरण यांचा संयोग आहे.

स्त्रियांच्या क्रिकेटचा एकूण प्रवास चढ-उताराचा राहिलेला आहे. 1775 मध्ये दक्षिण इंग्लंडमध्ये पहिला महिलांचा सामना खेळला गेला. 90 च्या दशकात सुधारणा होऊन चांगले दिवस आले. तरीही खूप झुंजावं लागलं. नुकत्याच झालेल्या महिला आशिया क्रिकेट चषक मध्ये भारतीय स्त्री क्रिकेट संघाने महिलांच्या क्रिकेट कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला लावला.



कु. मंगला रा. नागे
स. शि. जि. प. प्राथ. शाळा, शिंदी बु. ता.अचलपूर, जि. अमरावती.

भारतात 1975 हे स्त्री आत्मभानाचे वर्ष म्हणून नोंदवले स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांचा सहभाग सजक नागरिक बनण्याचे उदाहरण आहे. आता मतदानातही महिलांचा टक्का वाढलेला दिसला. महिला मतदारांची टक्केवारी 65.78% तर पुरुष मतदारांची टक्केवारी 65.55% होती. यावेळी महाराष्ट्रात 2024 झाली 800 महिलांनी निवडणूक लढविली.

जगाचा विचार केला तर जगभरात 31 पैकी पाच ठिकाणी महिला अध्यक्ष झाल्या यात आइसलँड, मेक्सिको, नामिबिया, उत्तर मेसोडोनियाआणि माल्दोवा प्रजासत्ताक आहे. अवकाश क्षेत्रात भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स यांनी अंतराळ अभ्यासासाठी आठ दिवसासाठी गेल्या. मात्र बाईंग स्टोर लाईन मध्ये झालेल्या तंत्रिक बिघाडामुळे अडकून पडल्या त्यातही त्यांनी निराश न होता अवकाशात सर्वात जास्त स्काय वॉकिंगचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला.

भारताच्या बावीस वर्षीय मनू भाकरणे पॅरिस ऑलम्पिक मध्ये दोन पदके जिंकून इतिहास रचला. अवनी लखेरा पॅरालिम्पिक मध्ये दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली. नॅन्सी त्यागी फॅशन फेस्टिवल 2024 मध्ये त्यांच्या स्वतः डिझाईन केलेल्या पोशाखाला पसंती मिळाली.

महिलांनी उद्योग क्षेत्रातही उत्तुंग भरारी घेतली आहे. केंद्र सरकारने 1.69 लाख महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांची नोंदणी केली आणि 23 लाख ऑर्डर पूर्ण केल्या.

मोना सिंह तेजस फायटर उडवणा?्या पहिल्या महिला ठरल्या. हॉस्पिटल सर्विसेस महासंचालक असलेल्या एअर मार्शल पदावर असलेल्या लेफ्टनंट साधना सक्सेना नायर भारतीय सैन्याच्या वैद्यकीय सेवा महासंचालक पदावर नियुक्त झालेल्या पहिला महिला ठरल्या. स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण व्हावे यासाठी स्वयंसहायता गट स्थापन झाला. याचे श्रेय अहमदाबाद येथील ईला भट यांच्याकडे जाते .आता सर्व भारतभर हे गट बँक व्यवहाराचे जोडले गेले आहेत .उद्योगी स्त्री स्वावलंबी झाल्या. उत्तर प्रदेश मध्ये काही स्त्रियांना ड्रोनचे प्रशिक्षण देण्यात येत आहे यात असंख्य स्त्रियांच्या आत्मशक्तीचा समावेश आहे.

मागे वळून पाहिले तर एकूणच स्त्रियांची स्थिती हा क्षेत्रात गगनचुंबी आहे. वैयक्तिक संसारिक, सामाजिक ,आर्थिक, क्रीडा, आरोग्य ,राजकारण व कायदा अशा सर्व क्षेत्रात स्त्रियांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. मात्र एका अदृश्य धाग्याने आजही ती सीमितता अनुभवते आहे. हे सत्यही नाकारता येत नाही. आव्हानांना तोंड देत स्त्रीशक्ती आगेकूच करून कामगिरी फतेह करत आहे.

• • •



# राजधानीतील साहित्यपूर्ण संमेलन

**ज्ञानेश्वर मुळे**

मराठी माणसाने आता तरी बहिर्मुख होण्याची गरज आहे. केवळ १९६० मध्ये भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठीत साहित्याचे पीक जोरदार वाढीस लागले आहे, एवढ्यावर समाधान मानून चालणार नाही.

दिल्लीतील अ. भा. मराठी साहित्य संमेलन संपून जेमतेम आठवडा झाला आहे. या संमेलनात नेहमीप्रमाणे अनेक विषयांवर टीकाटिप्पणी करणारी चर्चा झाली. खरे तर ती अजूनही सुरूच आहे.

मुख्य प्रवाहातील माध्यमांप्रमाणे समाजमाध्यमांतही आपापल्या मगदुराप्रमाणे आणि आकलनाप्रमाणे कुणी आसूड ओढत आहे, कुणी पाठ थोपटत आहे. कुणी चिमटे काढत आहे, तर कुणी तोंडसुख घेत आहे. आणखी एक-दोन आठवडे चर्चा सुरू राहील आणि मग हा विषय थंड होऊन लोक नव्या विषयांवर मतमतांतरे व्यक्त करु लागतील.

या संमेलनात मीही काही अंशी सहभागी होतो आणि एका सत्रात भागही घेतला. पण, तीनही दिवस मी संमेलनाला जवळपास पूर्ण म्हणता येईल अशी हजेरी लावली. पंतप्रधानांच्या उपस्थितीतील उद्घाटनापासून महाराष्ट्राच्या दोन उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीतील समारोपापर्यंत महत्त्वाची सर्व सत्रे मी पाहिली आणि ऐकली. आयोजनातही एक स्वयंसेवक म्हणून मी जमेल तितके काम केले. या पार्श्वभूमीवर कोणताही पूर्वग्रह न बाळगता आपली काही निरीक्षणे मांडण्याचा प्रयत्न मी इथे करत आहे.

विचारकलहाला का भिता? असं आगरकरांनी म्हटलं होतं, तेव्हा भारत पारतंत्र्यात होता. समाज अनेक अनिष्ट प्रथांमध्ये लिप्त होता. आता स्वातंत्र्याच्या अवकाशात ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर काही अपवाद वगळता अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा बहुसंख्य नागरिक लाभ घेत आहेत आणि त्याबाबतीत व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीप्रमाणे मतमतांतरे असणार, यात शंका नाही. या वेळीही संमेलनाची व्यवस्था, आमंत्रणपत्रे देताना उडालेला गोंधळ, राजकीय नेत्यांचा सहभाग, अमुक साहित्यिकांचा अनुपस्थिती अशा अनेक विषयांवर चर्चा आणि टीकाही झाली, ती अद्याप सुरू आहे.

संमेलनात अनेक उणिवा होत्या. खरे तर प्रत्येकाची प्रत्येक इच्छा किंवा सूचना विचारात घ्यायची झाली, तर (लोकशाही मान्य करुनही) संमेलन होणे अशक्य आहे. महाराष्ट्रात पत्रकार आणि विचारवंत, लेखक आणि टीकाकारांची अजिबात कमतरता नाही. शिवाय, प्रत्येकाचा स्वतःचा एक अजेंडा आणि फुगलेला अहं असतो. या पार्श्वभूमीवर संमेलन शेवटपर्यंत चांगले चालले आणि संपन्न झाले, हीच एक कामगिरी आहे.

पण, या सगळ्या धामधुमीतून आणि चर्वितचर्वणातून काही शिकण्यासारखे आहे का? हो, आहे. आणि तेच खरे तर आपण करत नाही. संमेलनाची चर्चा ही त्याचे स्थळ आणि अध्यक्ष जाहीर झाल्यावर सुरू होते आणि संमेलनाचे सूप वाजल्यावर काही काळापर्यंत चालते. पुन्हा चर्चा होते ती पुढच्या वर्षीचे स्थळ आणि अध्यक्ष निवडीच्या वेळी.

साहित्य महामंडळाची एक प्रक्रिया आहे. ती पूर्ण पारदर्शक करुन सर्वांना या प्रक्रियेची माहिती देणे महत्त्वाचे आहे. ही प्रक्रिया सर्वांना समजली तरी अर्धी-अधिक टीकाटिप्पणी टळेल. उदा. पूर्वी निवडणुका व्हायच्या. आता अध्यक्षांची निवड होते. निवडणुका होत्या तेव्हा अनेक अनिष्ट गोष्टींना वाव होताच; शिवाय साहित्यिकांचे राजकारण बघायची संधी सगळ्यांना मिळायची. आता मैफिलीचा तो भाग काहीसा नीरस झाला आहे. पण, निदान राजकारणाने येणारी कटुता तरी दिसत नाही.

दुसरी बाब म्हणजे, आधीच्या आणि होऊ घातलेल्या संमेलनाची अवास्तव चर्चा. अवास्तव यासाठीच की, ही चर्चा फक्त व्यवस्थेसंबंधी असते. ती साहित्याविषयीच्या प्रश्नांवर अजिबात नसते. दिल्लीच्या संमेलनाची इचलकरंजीच्या किंवा जळगावच्या संमेलनाशी तुलना करणे योग्य आहे का? महाराष्ट्रापासून शेकडो किलोमीटर दूर आलेल्या आपल्या सैन्याची पानिपतावर थंडीमुळे दैना झाली, असे इतिहास सांगतो. प्रत्येक ठिकाणची व्यवस्था, वातावरण आणि संदर्भ वेगळे असतात.

दिल्लीत तर अनेक हितसंबंध आपोआप सक्रिय होणे साहजिक होते. ७० वर्षांनी आणि अभिजात भाषेच्या मान्यतेनंतर पंतप्रधानांच्या उपस्थितीत राजधानीमध्ये आपल्या साहित्याचा सन्मान होणे, ही गोष्ट महाराष्ट्राला भूषणावह नाही का? त्या समारंभातही प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष दृष्टिकोनाच्या वेगवेगळ्या छटा व्यक्त झाल्या, हा भारतीय लोकशाहीचा विजय नाही का? ही भाषणे परिपूर्ण नव्हती, पण ती मुख्यतः मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्र यावर केंद्रित होती, हे महत्त्वाचे.

आयोजकांची दिल्लीतील कसरत गेली चार - पाच महिने सुरू होती. या दरम्यान वातावरण निर्मितीसाठी अनेक उपक्रम घेण्यात आले. पुस्तक प्रकाशने, वक्त्यांची भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम यातून स्थानिकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. महादजी शिंदेंची लेखनकामाठी प्रकाशात आणली गेली. तीन दिवसांच्या कार्यक्रमांचे नेटके आयोजन करण्यात आले. त्या दरम्यान आणि आजही प्रशंसा व टीका या दोन्ही गोष्टींना समबुद्धीने, समभावनेने स्वीकारले गेले.

साहित्य संमेलनातील कविसंमेलनाचे स्वरुप बदलायला हवे. कारण कवींची प्रचंड संख्या ही स्वागतार्ह गोष्ट असली, तरी तास- तास कविता शांतपणे ऐकणारा श्रोतृवृंद संमेलनात नसतो. यावर उपाय म्हणजे, कवितांचे वेगळे संमेलन ठेवणे किंवा कवींच्या संख्येला गुणात्मकतेच्या कठोर निकषांवर कात्री लावणे. पण, चांगली कविता कोण ठरवणार? शिवाय, प्रत्येक कवीचा अभिनिवेश मंच हा आपला अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच असा असेल, तर महामंडळाने तरी काय करायचे?

संमेलनाचा भव्यता हाच केवळ एक निकष कशासाठी हवा? एका विशाल अखिल भारतीय साहित्य संमेलनाऐवजी तीन किंवा चार संमेलने चार वेगवेगळ्या ठिकाणी का करु नयेत? त्यामुळे अनेकांनी संधीही मिळेल. छोट्या संमेलनांमुळे खर्चही कमी येईल. जिथे कधीच झाले नाही किंवा नजीकच्या काळात होण्याची शक्यता नाही, अशा ठिकाणीही संमेलने होतील. शिवाय, या विविध ठिकाणी साहित्यावर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे.

साहित्य संमेलनाइतक्याच मराठी आणि महाराष्ट्राच्या भवितव्याशी संबंधित गोष्टींवरही संमेलनाच्या निमित्ताने चर्चा व्हायला हवी. दिल्लीतील संमेलनाच्या औचित्याने ती काही प्रमाणात झाली.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासन, नूतन मराठी विद्यालयासाठी मदतीची घोषणा, मराठी माणसांसाठी दिल्लीत भव्य मराठी संकुल, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रस्तावित व्यवस्था अशी काहीशी चांगली सुरूवात या संमेलनाच्या निमित्ताने झाली. पण, त्याची नाममात्र दखल घेण्यापलीकडे आपण सर्वांनी काय केले?

मराठी माणसाने आता तरी बहिर्मुख होण्याची गरज आहे. केवळ १९६० मध्ये भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठीत साहित्याचे पीक जोरदार वाढीस लागले आहे, एवढ्यावर समाधान मानून चालणार नाही.

पुढच्या काही वर्षांत बृहन्महाराष्ट्रातील मराठी शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांचे पुनरुज्जीवन किंवा संवर्धन, अटकपासून कटकपर्यंत घडलेल्या मराठी इतिहासाच्या अवशेषांचे दस्तावेजीकरण व संरक्षण, तसेच देशातील १० प्रमुख विद्यापीठांमध्ये मराठी अध्यापनासाठी अध्यासनांचे प्रावधान या गोष्टींना साहित्याइतकेच महत्त्व शासन व मराठी जनतेने दिले पाहिजे. साहित्य म्हणजे सर्वांना सहित अर्थात सोबत घेऊन जाणारे अशी व्याख्या असेल, तर ते सर्जनशील आणि समावेशक असणे आवश्यक आहे.

■ ■ ■

# महिलांनी प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत केलं!

**प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर. 9595255952**

आपल्या देशात जात, धर्म, भाषा, प्रांत, लिंग अशा भेदातून सामाजिक व आर्थिक विषमतेला प्रबळ करणारी पुरक व्यवस्था शेकडो वर्षापासून या देशात प्रस्थापित होती. तिला हळू-हळू कां होईना पोखरुन काढण्याचा स्त्रियांनी सातत्याने प्रयत्न सुरु केल्याचे इतिहासात डोकावतांना निदर्शनास येते.

आजची स्त्री कुठल्याही क्षेत्रात मागे नाहीच. जसे की आर्थिक, सामाजिक, राजकिय, औद्योगिक, कला, साहित्य, सहकार, क्रिडा व प्रशासनात अशा प्रत्येक क्षेत्रातील शिखरावर स्त्रिया अग्रेसर आहेत. खरं शिक्षण व खरा शिक्षक माणसाला भेटतो तो जगाच्या शाळेत. कुणाच्या छत्रछायेखाली, विनाश्रमात मिळणारे शिक्षण झिरपणारच नाही. मेहनतीचं मिळवलं तरच टिकेल, शिक्षण हे कष्टानं मिळवलं पाहिजे. यात स्त्रिया फारच पुढे सरसावल्या आहेत.

स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते. भावूक, हळवी असते. कुटुंबाचा सांभाळ करते, कुटुंबाला आधार देते. पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते, कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायतही कर्तव्यदक्ष असते. त्या क्षेत्रात असूयेचा वास आल्यावर अस्वस्थ होते, क्वचितच पुरुषाचा विपरीत अनुभव आल्यानंतर संतापते, पण त्याला क्षमाही करते. अनेक आघाडयांवर अथकपणे चालत असते, त्यावेळी तिला येणारा कंटाळा तात्पुरता असतो, तिचे गुंतणे हेच शाश्वत असते. तसे गुंतता येणे हीच तिची शक्ती असते, त्या शक्तिनिशी ती सर्व अपेक्षाभंग, पराभव, दुरावे, वियोग यांना तोंड देते.

तिची दृष्टी भविष्याकडे असते. त्यामुळे ती बध्दतेतही मुक्ती शोधू शकते, निदान त्या मुक्तिची स्वप्ने पाहते. म्हणूनच ती आशवादी राहून सकारात्मक निर्णय घेते. उध्वस्त न होता रुजणे, स्वतःत, इतरांत आणि एकंदरीने आयुष्यात रुजणे हा तिचा निर्धार असतो. आयुष्य जसजसे पुढे सरकते तसतसा हा निर्धार अधिक शक्तिशाली होत जातो आणि या शक्तिची तिला स्पष्ट जाणीव असते. तिच्यात सूर्याची प्रखरता, चंद्राची शितलता असते.

कधी ती एखाद्या सामाजिक भोवऱ्यात अडकते, कधी एखाद्या मानसिक पेचप्रसंगात, त्यातून तिला नेहमीच वाट दिसते असे नाही. कधी क्षमा करते तर कधी मत्सराने पेटते. कधी वंचनेने दुःख मूकपणे सोसते, तर कधी त्याविरुध्द बंड करते...अशी असंख्य रुपे स्त्रीत आढळतात. तरीही स्त्री पूर्णपणे सापडलेली आहे असत अजूनही वाटत नाही. तिचा शोध अजून सुरु आहेच.

माणूस स्त्रीला फारसं ओळखू शकलं नाही, हे ही वास्तव आहे. ही स्त्री भारतीय आहे, ती मध्यमवर्गीय कुटुंबात वावरते, घर हे तिच्या भावजीवनाचे केंद्र आहे आणि पुरुष हा तिचा आधार आहे, हे नाकारुन आयुष्य जगणारी स्त्री अगदी विरळपणेच पाहिली. तिचा स्वतत्र असण्याचा अहंकार, पुरुषाच्या पुढे जाण्याची ईर्ष्या कुटुंब व विवाह या संदभार्तील आधुनिक विचारांचा तिच्यावर पडणारा प्रभाव. त्यामुळे ती हतबल झाली, एकीकडे माणूस स्त्रीला भरारी घेण्यासाठी प्रवृत्त करतात अन दुसरीकडे तिचे पंख छाटले जातात ही मानसिकता बदलली पाहिजे, तेव्हाच ती बेडर होऊन कोणतेही क्षेत्र पादक्रांत करायला अवधी लागणार नाही.

■ ■ ■

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयाचे प्रबोधनमूल्य

**डॉ. सुभाष सावरकर**
'जनसाहित्य', शिल्पकला कॉलनी, शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती
९८६०४५१०७५

**उत्तरार्ध**

(मागील अंकावरून पुढे)

'राष्ट्रोद्धारक सेवाधर्म' (श्रीगुरुदेव, डिसेंबर 1947) या लेखात राष्ट्रसंत लिहितात- 'सेवाभावात जगाचे खरे जीवन आहे आणि स्वार्थबुद्धीत त्याचा सर्वस्वी नाश आहे. 'मनुष्यमात्राची सेवा करणे व आपल्या उद्दिष्टांचे ज्ञान लोकांना देणे; मित्रांना आणि शत्रूंनाही माणुसकी शिकविणे आणि स्वतः आचरून दाखवून तो जिवंत पाठ दुसऱ्यांपुढे ठेवणे हे सेवकाचे कार्य असते. सेवकाची जात सेवा, त्याचा पंथ सत्यता व त्याचा धर्म मानवता!

जिव्हाळ्याची सेवावृत्तीच राष्ट्राला नवजीवन देत असते; तर गुलामी वृत्तीचे भाडोत्री लोक प्रसंगी आपल्या सहित देशाचा नाश करीत असतात. मानवतेच्या या सेवाधर्माला राष्ट्रसंत 'सतीचे वाण' संबोधतात; आणि 'सेवक व्हा!' हाच आज भारतमातेचा आदेश आणि निसर्गाचा संदेश आहे, अशी तरुणांना ग्वाही देतात. याच लेखात ते लिहितात, अशी सेवा करण्याची दृष्टी भारतातील सर्व सेवकांना नवतरुणांना प्राप्त झाली तर रामराज्य, सुराज्य, सत्ययुग इत्यादी शब्द मूर्तरूप घेऊन भारतवर्षाचे नंदनवन नव्या नवलाईने फुलवतील; मात्र ते जर आपल्या हजारो मतभेदांच्या, तर्ककुतर्कांच्या चक्रव्यूहात धडपडतच वेळ गमावतील तर सर्वांना पश्चाताप करण्याची पाळी खात्रीने येईल.

'जिवंत राष्ट्रधर्म' (युगप्रभात, पृ.10) या शीर्षकाच्या लेखात राष्ट्रसंतांनी अपेक्षा व्यक्त केली आहे- 'भारत देशाचा धर्म एकच असावा; त्याचा बाणा एकच असावा; त्याची भाषा व त्याची प्रार्थनाही एकच असावी आणि त्याची सर्व संपत्तीही सर्वांची असावी. मानवधमार्चा प्रकाश जगावर पसरविणारा हा देश जगात पूज्य मानला जावा व तो आतूनही तितकाच उज्वल आणि बलवान असावा.

मात्र, राष्ट्रधर्म जिवंत असेल तरच देश जागतिक जीवनसंघर्षात विजयी होईल. त्यासाठी सर्वप्रथम देशातील व्यक्ती-व्यक्तीच्या स्वभावातून द्वेष, मत्सर, गटबाजी, चोरी, लबाडी आदी दुर्गुणांचे उच्चाटन होणे व उत्तम विचारांचे शिक्षण मिळणे आवश्यक असते; आणि गावातील सार्वजनिक हिताचे जे जे कार्य असेल ते सगळे आपले आहे, असे कळकळीने समजून सहभाग देणेही आवश्यक असते. हे सर्व जाणून घेण्याचे अर्थात बौद्धिक उन्नतीचे सात्त्विक स्थान 'सामुदायिक प्रार्थना' हे आहे. धर्म व देश यांच्या सेवेचा मार्ग प्रशस्त करण्याचे माध्यम सामुदायिक प्रार्थना होय.

याच लेखाअखेरीस राष्ट्रसंत भारतीय तरुणांना संदेश देतात भारतात आजचा हा आपत्काळाचा घनघोर अंधार नामशेष होऊन सत्ययुगाची प्रभात फुलावी अशी तुझी इच्छा आहे ना? तर मग तू जिवंत राष्ट्रधर्म आचरू लाग, हीच त्याची साधना आहे !

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या हिंदी व मराठी गद्य-पद्याचा भाग तथा स्फुट-ललित वाङ्?मयातील प्रारंभकाळातील देवभक्तीचा भाग व तांत्रिक, आध्यात्मिक साधनेशी संबंधित गूढरचनांचा भाग वगळता त्यांचे बहुतांश वाड्मय हे इथवर विवेचन केलेल्या धर्मसोपानाचे प्रबोधन करण्याच्या हेतूने निर्माण झाले आहे.

त्यांच्या एकूण वाङ्मयसंभाराचा मेरूमणी शोभेल अशा 'ग्रामगीता' (1955) या ग्रंथामध्ये राष्ट्रसंतांच्या तोवरच्या 36 वर्षांमधील वाङ्मयनिर्मितीचा परिपाक उतरला असून राष्ट्रसंतांना अभिप्रेत असलेला मानवधर्माचा सोपान (1) व्यक्तिधर्म (2) कुटुंबधर्म (3) संघटनधर्म (4) समाजधर्म (5) राष्ट्रधर्म आणि (6) विश्वधर्म या अनुरोधाने विवेचिला गेला आहे :

तसेच-
विश्व ओळखावे आपणावरून।
आपणचि विश्वघटक जाण।
व्यक्तिपासून कुटुंबनिर्माण।
कुटुंबापुढे समाज आपुला ।।45।। (अ.1)
समाजापुढे ग्राम आहे। ग्रामापुढे देश राहे।
देश मिळोनि ब्रह्माण्ड होय।
गतीगतीने जवळ ते ।।46।। (अ.1)

या शब्दांत या विविध पायऱ्यांमागील सूत्र स्पष्ट केले आहे. या मांडणीप्रमाणे-

व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म।
समाजधर्म, गांवधर्म।
बळकट होई राष्ट्रधर्म।
प्रगतिपथाचा ।।16।। (अ.2)
व्यक्ति व्हावी कुटुंबपूरक। कुटुंब व्हावे समाजपोषक ।
तैसेचि ग्राम व्हावे राष्ट्रसहाय्यक। राष्ट्र विश्वा शांतिदायी ।।17।।
याकरिता जी जी रचना।
तियेसि धर्म म्हणति जाणा।
देशद्रोह अधार्मिकपणा।
एकाच अर्थी ।।18।। (अ.2)

मात्र 'ग्रामगीता' ग्रंथाच्या पहिल्याच अध्यायात ग्रामगीतेचे निर्मितिकारण स्पष्ट करताना त्यांनी जो दृष्टान्त वर्णिला आहे, त्यानुसार 'कासया करावी। विश्वाची मात? प्रथम ग्रामगीताचि हातात। घ्यावी म्हणे।।' या निष्कर्षावर राष्ट्रसंत स्थिरावलेले दिसतात.

याच भूमिकेतून 'गाव हा विश्वाचा नकाशा' म्हणून राष्ट्र आणि विश्वाच्या सुबत्तेची / सुव्यवस्थेची परीक्षा ग्रामाच्या व्यवस्थेवरून करण्याचा त्यांचा विचार यापुढील विवेचनात दिसून येतो; त्यामुळे व्यक्तिधर्म ते ग्रामधर्म एवढाच धर्मसोपान येथे राष्ट्रसंत देतात :

विश्वाचा घटक देश। गाव हाचि देशाचा अंश।
गावाचा मूळ पाया माणूस।
त्यासि करावे धार्मिक ॥22।।
व्यक्तिधर्म सर्वां कळावा। कुटुंबधर्म आचरणी यावा।
ग्रामधर्म अंगी बाणावा। राष्ट्रधर्माच्या धारणेने ॥

या अनुरोधाने राष्ट्रसंतांनी व्यक्तिधर्म अत्यंत संक्षेपाने विवेचिलेला दिसतो. राष्ट्रसंत म्हणतात,

'प्रथम पाया मानव-वर्तन।
यास करावे उत्तम जतन ।।48।।' (अ.1)
'मुख्य धमार्चे लक्षण। त्याग अहिंसा सत्य पूर्ण।
अपरिग्रह ब्रह्मचर्य जाण। तारतम्ययुक्त ।।19।।
'निर्भयता शरीरश्रम। परस्परांशी अभेद प्रेम।
पूरक व्हावया विद्या-सत्कर्म। सकालांसाठी ।।20।।'

अर्थात व्यक्ती-व्यक्ती धार्मिक व्हावी म्हणजे एकांगी / लहरी बनावी असे नव्हे; तर तिचा भौतिक आणि पारमार्थिक विकास व्हावा. याचाच अर्थ शरीर-मन-वाणी-इंद्रिये-बुद्धी-प्राण या सर्वांच्या विकासाची साधना म्हणजे (व्यक्ति) धर्म होय. आणि या सद्धमार्चे ज्ञान रुजविण्यासाठीच पूर्वसूरींनी आश्रम-व्यवस्थेची योजना केली असल्याचे राष्ट्रसंत विवेचितात.

राष्ट्रसंतांच्या मते व्यक्तिधमार्चा पाया विद्यार्थीधर्म असून त्यासाठी ब्रह्मचर्याश्रमाची योजना आहे, गृहस्थाश्रम हा गृहस्थ/कुटुंबधमार्चा निदर्शक असून त्यात ऋषिऋण-देवऋण फेडण्यातून कुटुंबसेवा, जीवसेवा व ग्रामसेवा धर्मरूप होण्यासाठी संयम आणि त्यागबुद्धीचे महत्त्व राष्ट्रसंतांनी निरूपले आहे. तिसऱ्या 'वानप्रस्थाश्रम' हा समाज वा समूहाच्या कल्याणाचा धर्म असून चौथा 'संन्यासाश्रम' हा ग्रामधर्मास इष्ट गरिमा व आकार आणून देणारा ग्रामविकासाशी-पयार्याने प्रांत तथा देशविकासाशी निगडित धर्म होय. अंततः तो विश्वधमार्शीच जोडून देण्याचे गृहीतक राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या सुरुवातीलाच उघड केले आहे.

ग्रामसेवाचि देशसेवा। देशसेवाचि ईश्वरसेवा।
हाचि अनुभवावया जीवभावा।
वानप्रस्थ आश्रम ।।99।। (अ.3)
करावी ग्रामसेवा ज्ञानसेवा।
वानप्रस्थवृत्ति वाणवूनि जीवा ।
आणि मोक्षासाठी साधावा।
संन्यासभाव ।।7।। (अ.4)
झाला वासनेचा नाश।
त्यासीच नाम असे संन्यास ।
मग त्याचे सर्व करणे निर्विष।
आदर्श लोकी ।।10।। (अ.4)

अशाप्रकारे 'व्यक्तिधर्म' ते 'ग्रामधर्म' या सोपानाचा सार सांगताना ग्रामगीतेत राष्ट्रसंतांची भूमिका ही गुणसंग्राहकतेची व कार्यतत्परतेची दिसते. ते म्हणतात-

सुखे करावा संसार। साधेल तैसा परोपकार।
चारही आश्रमांचा सार।
आचरणी आणावा ।।36।। (अ.4)

आणि या आचरणात संयम, त्याग व विवेक यांबरोबरच सेवाभाव व सेवाधर्म यांस त्यांनी ग्रामधर्माच सार व संघटनेचे सूत्र म्हणून अतिशय महत्त्व दिल्याचे पदोपदी ध्यानात येते.

■ ■ ■



सलमान खानच्या बहुप्रतिक्षित 'सिकंदर' ची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट ईदच्या दिवशी थिएटरमध्ये दाखल होईल. भाईजानचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काय कमाल करेल हे येणारा काळच सांगेल, पण काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या त्याच्या टीझरने चांगलीच खळबळ उडवून दिली होती. या टीझरला यूट्यूबवर तीन कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले.

# 'सिकंदर' ची प्रतीक्षा

'सिकंदर' च्या निर्मात्यांनी आता सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना स्टारर चित्रपटातील 'जोहरा जबीन' हे पहिले गाणे रिलीज केले असून त्याची एक झलक समोर आली आहे. सध्या ईदच्या उत्साहात भाईजानचे हे गाणे यूट्यूबवर धुमाकूळ घालत आहे. 'दबंग' खान आणि रश्मिकाची पडद्यावरची केमिस्ट्री प्रेक्षकांना किती आवडेल याचा अंदाज त्यांच्या पहिल्या गाण्यावरूनच येत आहे. 'जोहरा जबीन' मध्ये सलमान खानची एन्ट्री पूर्ण स्वॅगसह दाखवण्यात आली आहे. या गाण्यातील त्याच्या डान्स स्टेप्स मागील गाण्यांपेक्षा खूपच वेगळ्या आहेत. नेहमीच आपल्या लूकमध्ये असणारा भाईजान या गाण्यात गुडघे टेकून रश्मिकावर प्रेम व्यक्त करताना दिसतो. गाण्यातील हे दृश्य चाहत्यांना खूप आवडत आहे. 'जोहरा जबीन' हे गाणे नकाश अझीझ आणि देव नेगी यांनी गायले आहे. गाण्याला संगीत प्रीतम दा यांनी दिले आहे. याशिवाय, आजच्या प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन त्यात रॅप देखील जोडण्यात आला आहे. तेव्हा या दोघांची केमिस्ट्री बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्याची अपेक्षा आहे.



# रान्यावर तस्करीचा आरोप

कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री रान्या राव ला पोलिसांनी अटक केली आहे. अलिकडे पोलिस तिच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय सहलींवर लक्ष ठेवून होते. अखेर सोन्याची तस्करी केल्याच्या आरोपाखाली तिला बेंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती डीपीजीची मुलगी म्हणून स्वत:ची ओळख करून द्यायची आणि स्थानिक पोलिस कर्मचाऱ्यांना घरी सोडण्यासाठी फोन करायची.



दुबईहून एमिरेट्सच्या विमानाने बेंगळुरूला उतरल्यानंतर पोलिसांनी तिला अटक केली. डीआरआय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार तिच्या अंगावर बरेच सोने होते. खेरीज तिने कपड्यांमध्ये सोने लपवले होते.१५ दिवसांमध्ये चार वेळा दुबईला गेल्यानंतर अधिकाऱ्यांना अभिनेत्रीवर संशय येऊ लागला होता. सोन्याच्या तस्करीत तिला पोलिस किंवा इतरांकडून काही मदत मिळत होती का, याचा तपास आता सुरू आहे. यासंबंधी अभिनेत्रीला १४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली. विमानतळावर तिच्याकडून एकूण १४.८ किलो सोने जप्त करण्यात आले. या सोन्याची बाजारभाव किंमत सुमारे १२ कोटी रुपये आहे. या बातमीबद्दल चित्रपटसृष्टीत अनेक प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. रान्याने प्रसिद्ध अभिनेता सुदीपसोबत 'माणिक्य' (२०१४) मध्ये काम केले आहे. आता पोलिस अधिकारी यासंबंधांची गांभीर्याने चौकशी करतील. त्यामुळेच तिच्या नेटवर्कमधून कोणताही गुन्हेगार सुटू शकणार नाही, असे वाटते.



# 'विकेंड' आता ओटीटीवर

मनोरंजनविश्वात 'ऑस्कर'ची चर्चा असतानाच सोहळ्यात अनेक छोट्या बजेटच्या चित्रपटांनी दाखवलेली ताकदही प्रेक्षकांनी अनुभवली. आता या शोमध्ये पुरस्कार मिळवलेल्या अनेक कलाकार आणि चित्रपटांबद्दल लोकांमध्ये रस वाढला आहे. त्यातील असाच एक चित्रपटाच्या ओटीटी रिलीजची माहिती अवश्य जाणून घ्या. आता हा चित्रपट तुम्ही ऑनलाइन पाहू शकता.

हॉलिवूड दिग्दर्शक जॉन एम चू यांचा 'विकेड' हा चित्रपट गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित झाला होता. तो खूप लोकप्रियही झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही उत्तम कलेक्शन केले. आता ओटीटी रिलीजबाबत बातम्या अशी की, तो २१ मार्च २०२५ रोजी जिओहॉटस्टारवर स्ट्रीम केला जाणारा आहे. चित्रपटात प्रसिद्ध गायिका एरियाना ग्रांडे देखील मुख्य भूमिकेत दिसत आहे.

'विकेड' च्या कमाईबद्दल बोलायचे झाले तर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याने ७०० दशलक्ष डॉलर्सचा आकडा ओलांडला होता. या चित्रपटाने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ४६०.६ दशलक्ष कमावले. अलीकडेच या चित्रपटाबद्दल बातमी आली की तो ७ मार्च रोजी जपानमध्ये प्रदर्शित झाला.

लोकप्रिय अमेरिकन पॉप गायिका आणि अभिनेत्री एरियाना ग्रांडे तिच्या प्रतिभेने जगभरात स्वतःची वेगळी ओळख राखून आहे. ती अनेकदा वैविध्यपूर्ण पोशाखांनी लोकांना आश्चर्यचकित करते. ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात ही गायिका गुलाबी रंगाच्या गाऊनमध्ये दिसली होती. हा ड्रेस शियापरेली स्प्रिंग-समर २०२५ कलेक्शनमधील होता. एरियानाचा हा पोशाख इतका अद्भूत होता की पाहिल्यानंतर सर्वांच्याच नजरा तिच्यावर खिळून राहिल्या. यावेळी मोकळ्या केसांऐवजी एरियानाने अंबाड्यासदृश केशरचना केली होती. तिचा हा लूक सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला.

# ऑस्करवर 'अनोरा'ची छाप

या वर्षीच्या ९७ व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यावर 'अनोरा'च्या पाच ऑस्कर विजयाची अमीट छाप प्रेक्षकांनी बघितली. 'अनोरा' हा ऑस्कर २०२५ चा सर्वोत्तम चित्रपट रसिकांचे लक्ष वेधून गेला. त्यालाच यंदाचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी एकूण १० चित्रपटांना नामांकन मिळाले होती. ज्यात 'द ब्रुटालिस्ट', 'अनोरा', 'ड्यून पार्ट २', 'आय एम स्टिल हिअर', 'निकेल बॉय', 'द सबस्टन्स', 'विक्ड' आणि 'एमिलियन पेरेझ' यांचा समावेश होता. मात्र या सगळ्यांना मागे सारुन 'अनोरा'ने बाजी मारली, असेच म्हणावे लागेल.

२०२५ च्या ऑस्करमध्ये मिकी मॅडिसनला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. तिला 'अनोरा' तील दमदार अभिनयासाठी सन्मानित करण्यात आले. याच चित्रपटासाठी शॉन बेकर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. गाजलेल्या या अकादमी पुरस्कारांच्या सोहळ्यात यंदा ॲड्रियन ब्रॉडीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा किताब मिळाला. त्यांना हा पुरस्कार 'द ब्रुटालिस्ट' साठी मिळाला. ओपेनहायमर स्टार सिलियन मर्फी यांनी हा पुरस्कार प्रदान केला.



यंदा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटाचा ऑस्कर पुरस्कार 'आय एम स्टिल हिअर' या ब्राझिलियन चित्रपटाला मिळाला तर लोल क्रॉलीने सर्वोत्कृष्ट छायांकन पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट छायांकनाचा पुरस्का'द ब्रुटालिस्ट'ला मिळाला. तसेच या सोहळ्यात बड स्मिथपासून रॉजर प्रॅट आणि चार्ल्स शियरपर्यंत दिवंगत हॉलिवूड स्टार्सना भावनिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

यंदाचा लाईव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म पुरस्कार व्हिक्टोरिया वॉर्मीर्डन आणि ट्रेंट यांच्या 'आय एम नॉट अ रोबोट' या चित्रपटाने जिंकला. 'ड्यून पार्ट २' साठी पॉल लॅम्बर्ट, स्टीफन जेम्स, रेस साल्कोम्बे आणि गर्ड नेफझगर यांना सर्वोत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्सचा पुरस्कार मिळाला. तसेच सर्वोत्कृष्ट ध्वनीचा पुरस्कारही 'ड्यून पार्ट २' ला मिळाला. मायली सायरसकडून हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी गर्थ जेन, रिचर्ड किंग, रॉन बार्टलेट आणि डग हेम्फिल स्टेजवर आले होते.



# बॉक्स ऑफिसवर 'ड्रॅगन'चीही डरकाळी

सध्या बॉक्स ऑफिसवर एकामागून एक मोठ्या बजेटचे चित्रपट प्रदर्शित होत आहेत. या चित्रपटांच्या प्रचंड कलेक्शनमुळे निर्मात्यांना प्रचंड पैसा मिळत आहे. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत अनेक रेकॉर्ड मोडले. त्याच क्रमाने, विक्कीचा 'छावा' देखील बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करत आहे. या चित्रपटाने १७ दिवसांमध्ये जगभरात ६३७ कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे आणि अजूनही त्यात वाढ होत आहे.

पण या चित्रपटाच्या बोलबाल्यातही एका दक्षिण भारतीय चित्रपटाने कलेक्शनच्या बाबतीत शांतपणे १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे, हे नजरेआड करुन चालणार नाही. चर्चेतील या 'ड्रॅगन' नामक चित्रपटात प्रदीप रंगनाथन यांनी मुख्य भूमिका साकारली होती. अश्वथ मारिमुथु दिग्दर्शित हा चित्रपट २१ फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला आणि आता तो १०० कोटींच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. हा चित्रपट तमिळ तसेच तेलुगू भाषेत प्रदर्शित झाला आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळाले. चित्रपटाची कथा एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याभोवती फिरते. ११.२ कोटींनी सुरुवात केलेल्या या चित्रपटाने सकस कथेमुळे आता अनेक मोठ्या बजेटच्या चित्रपटांना मागे टाकले आहे. 'ड्रॅगन' बॉक्स ऑफिसवर मंद गतीने कमाई करत असताना अर्जुन कपूरचा 'मेरे हसबंड की बीवी' चांगला कमाई करत होता. पण अर्जुनचा चित्रपट विकी कौशलच्या चित्रपटासमोर जास्त काळ टिकू शकला नाही. असे असताना प्रदीपच्या चित्रपटाबद्दल मात्र प्रेक्षकांची क्रेझ कायम राहिली.

'ड्रॅगन' ५५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. जगभरातील कलेक्शनवर नजर टाकली तर, या चित्रपटाने तामिळनाडूमध्ये ५१.२५ कोटी रुपये, तेलुगू राज्यांमध्ये १३.६५ कोटी रुपये, कर्नाटकमध्ये ७.३० कोटी रुपये आणि परदेशात २१.८० कोटी रुपये कमावले आहेत. यावरुनच त्याचे व्यावसायिक यश किती मोठे आहे, याचा अंदाज बांधता येईल.

'ड्रॅगन' हा 'एजीएस' च्या बॅनरखाली झळकलेला २६ वा चित्रपट आहे. याआधी एजीएस एंटरटेनमेंटने प्रदीपचा 'लव्ह टुडे' हा चित्रपट तयार केला होता.

# वाद आणि '...हल्ला'

बंडखोर कवी आणि दलित पँथर चळवळीचे संस्थापक नामदेव ढसाळ यांच्या वाटचालीचा वेध घेणारा, त्यांचे काम समोर आणणारा 'चल हल्ला बोल' या चित्रपटाची सध्या चर्चा आहे. हा चित्रपट प्रामुख्याने दलित पँथर, युवा क्रांती दल आणि त्यांच्या चळवळीवर आधारित आहे. तथापि, चित्रपटातील नामदेव



ढसाळ यांच्या कवितांवर सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला आणि चर्चेला तोंड फुटले. खेरीज त्यातील एका कवितेत अश्लीलता आहे असे सांगत 'ढसाळ कोण आहे? मला काहीच माहीत नाही' असे विधान केल्याने मोठा वाद निर्माण झाला. त्यानंतर लगेचच चित्रपटाच्या संपूर्ण टीमने या विधानावर आक्षेप नोंदवत संताप व्यक्त केला. या मुद्द्यावर महाराष्ट्रातील लोकही नाराजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, प्रसिद्ध दिग्दर्शक आणि अभिनेते हेमंत ढोमे यांनीही या घटनेवर दुःख व्यक्त केले. 'नामदेव ढसाळ यांचे विचार अनेक प्रश्नांवर विचार करायला भाग पाडतात. ते व्यवस्थेला प्रश्न विचारतात. नामदेव ढसाळ हा समता आणि मानवता पसरवणारा पँथर आहे. महाराष्ट्र, देश आणि संपूर्ण जगाला त्यांचा अभिमान आहे. जनमानसाचे नेते, महान जागतिक कवी म्हणजे 'नामदेव ढसाळ'... असे ते आपल्या प्रतिक्रियेत म्हणाले. दरम्यान, नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आणि ज्येष्ठ कवयित्री मल्लिका अमीर शेख यांनीही या विधानावर दुःख व्यक्त केले. अशा मुजोर अधिकाऱ्यांना सरकारने निलंबित केले असले तरी प्रश्न इथेच संपत नाही, असे त्या म्हणाल्या.

# 'अनुपमा'वर प्रेक्षक नाराज

रुपाली गांगुली गेल्या पाच वर्षांपासून 'अनुपमा' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे. मालिकेची कथा तिच्या व्यक्तिरेखेभोवती फिरते. पण अनेक वेळा या मालिकेला प्रेक्षकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. आताही एक नवीन व्हिडिओ समोर आला असून त्यात प्रेम आणि माहीचा एक सीन चित्रित करण्यात आला आहे. तो प्रेक्षकांना अजिबात आवडत नाहीये. व्हिडिओ प्रसिद्ध झाल्यानंतर, नेटकऱ्यांनी या दृश्यावर संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरील लोकांनी या शोवर टीका केली आहे आणि क्लिपला अश्लील म्हटले आहे. एकूणच या मालिकेबाबत लोकांकडून अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत. एका वापरकर्त्याने 'अरे देवा... कृपया, 'अनुपमा'च्या लेखकाने, पटकथेत असा सीन जोडण्यापूर्वी विचार करावा' असे म्हटले आहे तर दुसऱ्या वापरकर्त्याने 'हे पूर्णपणे निर्लज्जपणाचे आहे!' असे म्हणत निषेध नोंदवला आहे. याशिवाय, मालिकेत अनुपमाच्या मुलीने घातलेला वधूचा पोशाखही अनेकांना आवडत नाहीये. खरं तर, हा लेहेंगा काही वर्षांपूर्वी अनुपमाची भूमिका साकारणाऱ्या रूपाली गांगुलीनेही वधू म्हणून परिधान केला होता. अशा परिस्थितीत, काही सोशल मीडिया वापरकर्ते म्हणतात की, प्रत्येक उत्कृष्ट कृतीची एक स्वस्त आवृत्ती असते. राहीचा वधूचा गेटअप प्रेक्षकांना अजिबात आवडत नाहीये.





# 'शोले' होतोय ५० वर्षांचा

हिंदी चित्रपटसृष्टीतील क्लासिक चित्रपटांबद्दल बोलताना 'शोले'चे नाव निश्चितच अग्रक्रमाने येते. या वर्षी दिग्दर्शक रमेश सिप्पी यांचा 'शोले' प्रदर्शित झाल्यास ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे सध्या याची चर्चा आहे. आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमी (आयफा) च्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र यांच्या प्रसिद्ध चित्रपट 'शोले' चे विशेष प्रदर्शन आयोजित केले गेले. चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयफा आयोजकांनी जयपूरच्या प्रसिद्ध राज मंदिर चित्रपटगृहात चित्रपटाचे विशेष प्रदर्शन आयोजित केले. स्क्रिनिंग दरम्यान चित्रपटाशी संबंधित अभिनेते, सह-कलाकार आणि गायक त्यांचे अनुभव ऐकायला मिळाले. या स्क्रिनिंगला बॉलिवूडमधील मोठ्या सेलिब्रिटींची उपस्थिती बघायला मिळाली. कार्यक्रमाची खास गोष्ट म्हणजे 'शोले' आणि राजमंदिर सिनेमा हे दोघेही या वर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करत आहेत.

'शोले' १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला तर राजमंदिर सिनेमाची पायाभरणी १९६६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व. मोहनलाल सुखाडिया यांनी केली. पुढे १ जून १९७६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री स्व. हरिदेव जोशी यांनी त्याचे उद्घाटन केले. या निमित्त आयफाने जयपूरमध्ये 'सिल्व्हर इन द न्यू गोल्ड' या थीमअंतर्गत आपला २५ वा वर्धापन दिन साजरा करत आहे.